# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यसेवा स्पर्धा परीक्षेतील जागा वाढविण्याबाबत

**(१) ३७६ (२२-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यसेवा परीक्षेमध्ये विविध प्रवर्गातील अत्यंत कमी जागा असून शासकीय सेवेतील तहसिलदार, पोलीस उपविभागीय अधिकारी इ.अनेक पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा वेळेवर घेणे, सदस्य संख्या वाढवणे, अधिकार मर्यादा जास्त देणे व सक्षम बनविणे, विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेणे, रिक्त पदे (PSI, STI, कृषी सेवा,राज्यसेवा) भरणे, दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या पात्र उमेदवारांच्या नियुक्त्या करणे तसेच राज्यसेवा आयोगाच्या माध्यामातुन घेण्यात आलेल्या लिपिक परीक्षेचा व न्यायालयीन निकाल जलद व्हावेत तसेच अन्य व औषध प्रशासन, मुख्य परिक्षेचा निकाल लवकर लावण्यात यावा, इत्यादी मागण्या विद्यार्थी व लोकप्रतिनिधींमार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने विद्यार्थी हिताचा विचार करता राज्यसेवा परीक्षांतील जागांमध्ये वाढ व अन्य मागण्यांकरीता आंदोलनाचा इशारा स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थींनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यसेवा आयोगाची परीक्षा वेळेवर घेणे, सदस्य संख्या वाढवणे, अधिकार मर्यादा जास्त देणे व सक्षम बनवणे, विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेणे, रिक्त पदे (PSI,STI,कृषी सेवा,राज्यसेवा) भरणे, दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या पात्र उमेदवारांच्या नियुकत्या करणे तसेच राज्यसेवा आयोगाच्या माध्यामातुन घेण्यात आलेल्या लिपिक परीक्षेचा व न्यायालयीन निकाल जलद व्हावेत अन्य व औषध प्रशासन, मुख्य परिक्षेचा निकाल लवकर लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२६) :** (१), (२) व (३) होय.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि ५ सदस्यांची पदे मंजूर असून ती सर्व पदे भरलेली आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांमध्ये प्रश्नामध्ये नमूद संवर्गामधील रिक्त पदांचा समावेश सन २०२४ आणि २०२५ मध्ये होणाऱ्या परीक्षांमध्ये करण्यात आलेला आहे.

तसेच प्रलंबित असलेला लिपिक टंकलेखक परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेला असून उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

याचप्रमाणे महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासकीय सेवा परीक्षा २०२३ चा अंतिम निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहीर केला असून दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी उमेदवारांची शिफारस संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधून पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत

**(२) ३९८ (२२-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.पंकज भुजबळ, श्री.सत्यजीत तांबे : दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक २२९३४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) तीन महिन्यांपूर्वी राज्यसेवा २०२३ परिक्षेचा निकाल जाहीर केला असून आयोगाच्या अनागोंदी कारभारामुळे तीन महिन्यानंतरही संपूर्ण प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सन २०२३ मध्ये लिपिक टंकलेखक व कर सहाय्यक या पदांच्या परीक्षेची जनरल मेरीट लिस्ट जाहीर करण्यात येवून ११००० उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने माहे जून, २०२३ मध्ये राज्यसेवा गट-अ आणि गट-ब दर्जाच्या ३०३ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली असून माहे जानेवारी, २०२४ मध्ये मुख्य परीक्षा व ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात मुलाखती घेण्यात येवून उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली असून सदर निकाल जाहीर होऊन तीन महिन्यांचा कालावधी होवूनही पुढील प्रक्रिया पार पडली नसल्यामुळे उमेदवार नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) राज्यसेवा २०२२ च्या परिक्षेतील ६२३ उमेदवारांची मुलाखत घेऊन दिनांक १८ जानेवारी, २०२४ ला गुणवत्ता यादी जाहीर करुन एक वर्षाचा कालावधी होवूनही सन २०२२ पासून पूर्व,मुख्य परीक्षा आणि मुलाखत असा टप्पा पार करुन उपजिल्हाधिकारी, तहसिलदार आणि अन्य महत्वाच्या ६२३ पदांवर निवड झालेले उमेदवार व जलसंधारण

आणि जलसंपदा विभागातील नियुक्त झालेले उमेरदवार नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबतच्या सर्व याचिका निकाली निघाल्यानंतरही आयोगाने अंतिम फेरनिवड यादीही जाहीर केली परंतु सामान्य प्रशासन विभागाने अद्याप उमेदवारांना नियुक्त्या दिलेल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून त्यानुषंगाने निकाल जाहीर होऊन बराच कालावधी होवूनही नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांना तातडीने नियुक्ती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२६) :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा २०२३ परीक्षेचा निकाल जाहीर करुनही आयोगाच्या अनागोंदी कारभारामुळे नियुक्तीची संपूर्ण प्रक्रिया प्रलंबित राहीली आहे ही वस्तुस्थिती नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा-२०२३ या परीक्षेची पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी सर्व साधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असल्याने आयोगाने ती माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये घेतली होती. सदर वैद्यकीय तपसणीचे अहवाल माहे जानेवारी, २०२५ पर्यंत टप्प्याटप्प्याने आयोगाकडे प्राप्त झाले. वैद्यकीय चाचणीत अपात्र ठरलेल्या उमेदवारांना अपिलाची संधी देण्यात येवून सदर प्रक्रिया माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये पूर्ण झाली. तद्नंतर उमेदवारांनी पसंतीक्रम सादर करणे, भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करणे या प्रक्रिया पूर्ण करुन परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक २८ मे, २०२५ रोजी आयोगाने जाहीर केला आहे. निवड झालेल्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण दिनांक १ सप्टेंबर, २०२५ पासून सुरु झाले आहे.

(४), (५) व (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा-२०२२ च्या परीक्षेमध्ये शिफारस केलेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण दिनांक २ एप्रिल, २०२५ पासून सुरु झाले आहे.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची फेररचना करून पदभरती करण्याबाबत

**(३) ४६७१ (१४-१२-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनातील विविध खात्यांतील वर्ग दोन व वर्ग तीनची पदे पूर्वी ‘महापरीक्षा पोर्टल’मार्फत भरली जात होती. परंतु, बोगस उमेदवार, गुणांमध्ये फेरफार, तांत्रिक अडचणी यांसारख्या गैरप्रकारांमुळे केरळ लोकसेवा आयोगाच्या (KPSC) धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (MPSC) रचना केल्यास नोकरी भरती प्रक्रियेला गती आणि पारदर्शकता येईल, अशी मागणी विद्यार्थ्यांना केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केरळ लोकसेवा आयोगाची कार्यप्रणालीही महत्त्वाची आहे केरळ राज्य शासनाच्या सर्व कार्यालये, मंडळे, कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संघटना यांमधील रिक्त पदांची भरती केरळ लोकसेवा आयोगामार्फत होते, त्याच धर्तीवर राज्यातील सर्वच शासकीय नोकर भरती प्रक्रिया ‘महाराष्ट्र

लोकसेवा आयोगा'मार्फत (एमपीएससी) करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) रचना केली तर नोकरी भरतीला वेग आणि पारदर्शकता येण्यासाठी व महाराष्ट्र लोकसेवा आयोग सक्षम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०४-२०२६) :** (१) केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यातील सर्व शासकीय/ निमशासकीय पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याबाबतचे निवेदन माहे मार्च, २०२० रोजी शासनास प्राप्त झाले आहे.
(२) राज्य शासकीय सेवेतील गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सरळसेवेची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कार्यालयातील गट-क मधील सरळसेवेतील लिपिकवर्गीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच गट-ब (अराजपत्रित) व गट-क (वाहन चालक वगळून) संवर्गातील सरळसेवेची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय दिनांक १८ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने आयोगातील अध्यक्ष व सदस्यांची सर्व पदे भरण्यात आली आहेत. तसेच आयोगामध्ये तांत्रिक सदस्याचे एक पद नव्याने निर्माण करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा आकृतिबंध सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सर्व जिल्ह्यांमध्ये वसतिगृहे व अभ्यासिका उभारण्याबाबत

**(४) ५०१२ (१७-१२-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अमित गोरखे, श्री.प्रसाद लाड :**सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व अभ्यासकि सुरु करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी तसेच दहा जिल्ह्यांमध्यें दुग्धविकास विभागाच्या मालकीची जागा वसतिगृहासाठी उपलब्ध करुन हस्तांतरित करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यासंदर्भात मा.महसूल मंत्री यांनी संबंधितांना आदेश दिल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर योजनेच्या अनुषंगाने माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये पार पडलेल्या बैठकीत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आले असून सदर आदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आतापर्यंत किती जिल्ह्यांमध्ये आवश्यक जागा निश्चित करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु करण्याबाबत दहा जिल्ह्यांमध्यें दुग्धविकास विभागाच्या मालकीची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१७-०४-२०२६) :** (१) होय. मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक ०८/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना वसतिगृह बांधकाम योजनेकरीता सुयोग्य जागेची पडताळणी करुन जागा निश्चितीची कार्यवाही अंतिम करुन हस्तांतरण प्रक्रियेची कार्यवाही तात्काळ करून त्या इतर मागास बहुजन विकास विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(२) व (३) पुणे, जालना, बुलढाणा, भंडारा, वर्धा, गडचिरोली व रत्नागिरी या ७ जिल्ह्यांमधील जागा इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नावावर वर्ग करण्यात आल्या आहेत.

तसेच, दुग्ध व्यवसाय विकास विभागाने दिनांक ३०/०७/२०२५ व दिनांक ३०/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये त्यांच्या अखत्यारीतील सोलापूर, सांगली, धुळे, धाराशीव, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, चंद्रपूर, गोंदीया, परभणी, बीड व नांदेड अशा एकूण १३ ठिकाणच्या जागा सदरहू योजनेंतर्गत वसतिगृह बांधकामासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागास उपलब्ध करुन देण्याकरीता महसूल व वन विभागास प्रत्यार्पित केल्या आहेत.

वसतिगृहांच्या बांधकामासाठी सातारा, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, नंदुरबार, लातूर, हिंगोली, सिंधुदूर्ग, पालघर, नागपूर, कोल्हापूर व छ. संभाजीनगर या १२ ठिकाणी जागांची निश्चिती करण्यात आली असून सदर जागा इतर विभागाकडून इतर मागास बहुजन कल्याण विभागास हस्तांतरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

रायगड, ठाणे, मुंबई शहर व मुंबई उपनगर या ठिकाणी वसतिगृहांच्या बांधकामासाठी जागा अद्याप निश्चित झालेली नाही. तरी, जिल्हाधिकारी स्तरावर अशा ठिकाणी जागा निश्चित करून त्या इतर मागास बहुजन विकास विभागाकडे हस्तांतरित करून देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या पदांच्या परिक्षेचा निकाल प्रलंबित असल्याबाबत

**(५) ५८१३ (१७-१२-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या विविध पदांसाठी दिनांक १० मे, २०२५ रोजी मुंबई केंद्रावर झालेल्या परीक्षेचा निकालास पाच महिन्यापासून विलंब होत असल्यामुळे उमेदवारांमध्ये असंतोष वाढत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहिती घेवून सदर परीक्षेचे निकाल तातडीने जाहीर करुन पात्र उमेदवारांना नियुक्त्या देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०२६) :** (१) नाही, अशा आशयाच्या कोणत्याही तक्रारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे, तसेच शासनाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे दिनांक १०/०५/२०२५ रोजी उपसंचालक(माहिती) गट-अ (वरिष्ठ)(१२९/२०२२), वरिष्ठ सहायक संचालक(माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ वरिष्ठ उंदजतं/०००उपसंपादक गट अ (कनिष्ठ)(१३०/२०२२) व सहायक संचालक(माहिती), अधिपरिक्षक पुस्तके व प्रकाशने/ माहिती अधिकारी(गट-ब)(१३१/२०२२) या संवर्गातील एकूण ३४ पदांच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या आहेत. (याबाबत आयोगाने दिलेल्या ०४/०४/२०२५ रोजीच्या जाहिरातीची प्रत संलग्न) वरील पदांपैकी उपसंचालक(माहिती) या संवर्गातील पदांबाबत मुलाखतीचा टप्पा दिनांक २४/०२/२०२६ रोजी पार पडलेला आहे. उर्वरित संवर्गाच्या पदांबाबत लेखी परिक्षेच्या पुढील निवडप्रक्रीयेची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरू आहे.
(३) निरंक

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध विभागांतील ४४२ प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(६) ६६२२ (१७-०३-२०२६) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध विभागांतील तब्बल ४४२ प्रस्ताव उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या प्रशासकीय मान्यतेअभावी रखडल्या असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवासी सुविधा, प्रवाशांना अपघात भरपाई, ई-बससाठी चार्जिंग स्टेशन उभारणी, कर्मचारी तक्रारी आणि सुनावणी अशा सर्व प्रकारच्या प्रस्तावांचा त्यात समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळत आहे व चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध विभागांतील प्रस्तावांना तातडीने मान्यता देऊन कामांना गती मिळण्यासाठी शासनांकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (२१-०५-२०२६) :** (१), (२), (३) व (४) रा. प. महामंडळाचे बसस्थानकाचे आधुनिकीकरण/ पुनर्बांधणी/ कॉक्रीटीकरण करणे याकरीता शासन निधीमधून कामे प्रस्तावीत करण्यात येत असून सदर कामांचे प्रशासकीय मंजूरीचे प्रस्ताव, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाची निकड व आवश्यकतेनुसार वेळोवेळी मंजूर करण्यात येत असतात.

---

## महापुरुष जयंती व राष्ट्रीय दिनाच्या अधिकृत सूचीमध्ये संत तुकाराम महाराज यांच्या नावाचा समावेश करण्याबाबत

**(७) ६७०६ (१७-०३-२०२६) डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी निर्गमीत केलेल्या महापुरुष जयंती व राष्ट्रीय दिनाच्या अधिकृत परिपत्रकातून संत तुकाराम महाराज यांचे नाव वगळण्यात आल्याची बाब माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारकरी संप्रदायाचा आधारस्तंभ असलेल्या संत तुकाराम महाराजांच्या जयंतीचा उल्लेख सूचीत नसल्याने महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरेकडे दुर्लक्ष होत असून, प्रशासकीय उक्त चुकीमुळे विविध संघटनांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून राज्यातील सामाजिक सलोख्याला बाधा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारकरी संप्रदायाचा आधारस्तंभ असलेल्या संत तुकाराम महाराजांच्या जयंतीचा उल्लेख सूचीत करून सुधारित परिपत्रक निर्गमीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

दरवर्षी शासकीय निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरुष, थोर व्यक्ती यांचे जयंती / राष्ट्रीय दिन साजरे करावयाचे कार्यक्रम निश्चित करताना, तसेच सद्य:स्थितीतील कार्यक्रम व नव्याने समाविष्ट करण्यासाठी वर्षभरात शासनास प्राप्त झालेल्या एकत्रितरित्या निवेदने /मागण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतो. त्यास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानुसार परिपत्रक निर्गमित करण्यात येते. सदर जयंती /पुण्यतिथी व राष्ट्रीय दिनांकांपैकी काही जयंती कार्यक्रम हे तिथीप्रमाणे, काही कार्यक्रम तारखेप्रमाणे तर काही कार्यक्रम हे केंद्र शासनाने सूचित केल्याप्रमाणे साजरे करण्यात येतात.

सालाबादप्रमाणे राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती /पुण्यतिथी /राष्ट्रीय दिन या कार्यक्रमामध्ये यापूर्वी संत तुकाराम महाराज यांच्या नावाचा जयंती कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे दिनांक २९/१२/२०२५ च्या शासन परिपत्रकातून संत तुकाराम महाराजांचे नाव वगळण्यात आल्याची बाब दिसून येत नाही.

(३) संत तुकाराम महाराज यांच्या जयंती कार्यक्रमाच्या समावेश करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे. या संदर्भात त्यांच्या जन्म दिनांकाची निश्चिती करण्याकरीता सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई तसेच अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने यांचे कार्यालय, मुंबई या कार्यालयांकडून माहिती मागविण्यात आली असून, जन्म दिनांकाची माहिती प्राप्त झाल्यानंतर आगामी वर्षामध्ये संत तुकाराम महाराज यांचे जयंती कार्यक्रमामध्ये समावेश करण्याचे शासन परिपत्रक स्वतंत्र्यपणे निर्गमित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत महाविद्यालयांतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) ६७४९ (१७-०३-२०२६) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत शासकीय महाविद्यालयातील ६० टक्के शिक्षकांची पदे रिक्त असून राज्यात विद्यापीठांतर्गत ६ पशुवैद्यकीय महाविद्यालये, २- दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालये, ३ मत्स्य विज्ञान महाविद्यालये तर ४ पशु पैदास प्रक्षेत्रे महाविद्यालये असे १५ शासकीय महाविद्यालये आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकीय पदाची तात्काळ पद भरतीसाठी भारतीय पशु चिकित्सा आयोग आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने वेळोवेळी निर्देश दिलेले असून राज्य शासनाने भरती प्रक्रियेसाठी निर्गमीत केलेल्या दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी शासन निर्णयान्वे शिक्षकीय पदाची पद भरती करण्याचे ठरवले परंतु पुढे काहीही कार्यवाही झाली नसल्यामुळे पशु चिकित्सा आयोगाच्या नियमामुळे महाविद्यालयाची मान्यता रदद होण्याची भिती व्यक्त होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तसेच ६ पशुवैद्यकीय महाविद्यालये, २- दुग्ध तंत्रज्ञान महाविघालये, ३ मत्स्य विज्ञान महाविद्यालये, ४ पशु पैदास प्रक्षेत्रे महाविद्यालये असे एकूण १५ शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांच्या पदभरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०४-२०२६) :** (१) होय

(२), (३) व (४) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत रिक्त असलेली शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील १०० टक्के पदे भरण्यास दिनांक १६/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

सद्य:स्थितीत विद्यापीठाने दिनांक २७/०२/२०२६ रोजी शिक्षकेतर संवर्गातील एकूण १७५ पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली असून, शिक्षक संवर्गातील पदांची जाहिरात लवकरच प्रसिध्द करण्यात येत आहे.

---

## राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू करण्याबाबत

**(९) ६८२७ (१७-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत विमुक्त जाती भटक्या जमाती आश्रमशाळामधील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विभागाचा शासन निर्णय दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ नुसार राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) लागू झालेली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागांतर्गत असलेल्या आश्रम शाळेतील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची डीसीपीएसची रक्कम एनपीएस मध्ये वर्ग झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती आश्रमशाळा शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्त वेतन प्रणाली (NPS) लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२०-०५-२०२६) :** (१) होय.
(२) होय. याबाबत संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण यांचे स्तरावरून कार्यवाही सुरू असून संचालनालय स्तरावरून याबाबतचा पाठपुरावा सुरू आहे.
(३) व (४) याबाबत संचालनालय स्तरावरून आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे DCPS चे NPS मध्ये वर्गीकरण करण्याबाबत कार्यवही करण्यात येत आहे.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ई बसेस खरेदी कराराबाबत

**(१०) ६९१४ (१७-०३-२०२६) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत ५,००० ई-बसेस खरेदी करण्याबाबत करण्यात आलेल्या कराराच्या अनुषंगाने आतापर्यंत ७०० पेक्षा अधिक ई-बसेस महामंडळास प्राप्त झाल्या असून उर्वरित बसेस टप्प्याटप्प्याने प्राप्त होणे अपेक्षित आहे, तसेच सदर ई-बसेस विविध मार्गांवर धावण्यासाठी नियोजित असून त्या ई-वाहनांपासून होणारे उत्पन्न व खर्च यांचा लेखाजोखा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ई-बसेस प्रकल्प सुरू करण्यापूर्वी राज्यात एकूण किती ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले आहेत व किती ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव आहे, याचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, शासनाने ई-बसेसपासून मिळणारे प्रति बस सरासरी उत्पन्न, होणारा खर्च याबाबतचा तपशील तसेच ई-बसेस पुरवठ्यासाठी करार केलेल्या संबंधित कंपनीने निर्धारित कालमर्यादेत बसेस उपलब्ध न केल्यास कंपनीवर कारवाई करून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (२१-०५-२०२६) :** (१) होय.
(२) ५१५० ईबस प्रकल्प सुरु करणेपुर्वी रा.प.महामंडळात केंद्र शासनाच्या फेम-२ योजनेंतर्गत १५० ई-बसेस भाडेतत्वावर घेण्यात आल्या असून सदर बसेसच्या परिचालनाकरीता एकूण १० ठिकाणी चार्जिंग स्टेशनची उभारणी करण्यात आली आहे.

५१५० ई-बस प्रकल्पांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १७२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन / ई-बस आगार उभारणी करणे प्रस्तावित आहे. त्यापैकी ३२ ठिकाणची उच्च क्षमतेची चार्जिंग स्टेशनची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) माहे जानेवारी, २०२६ अखेरीस ९ मी ई बसेस प्रति किमी उत्पन्न रुपये ५५.४६ व खर्च रुपये ७८.१३ इतका आहे. तसेच १२ मी. ईबसेस प्रति किमी उत्पन्न रुपये ५८.८२ व खर्च रुपये ८७.०५ इतका आहे. पुरवठादारामार्फत विहीत कालावधीत बसेसचा पुरवठा केला नसल्यामुळे करारातील अटी व शर्तीं नुसार ई-बस पुरवठादार कंपनीला दंडात्मक रक्कम आकारणीची नोटीस देण्यात आली आहे.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील वि.जा.भ.ज आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी पावत्या नियमित मिळणेबाबत

**(११) ६९४३ (१७-०३-२०२६) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी वसतिगृह अधीक्षक, कामाठी इत्यादी पदावरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देय असलेले रजा रोखीकरणाचे लाभ मिळालेले नसल्याचे माहे जानेवारी,२०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक २९ सप्टेंबर,२०२४ च्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या शुद्धिपत्रकानुसार ज्या कर्मचाऱ्यांना दीर्घ रजा नसतात अशा कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण लागू असून याच आधारे दिनांक ३ मे, २०२५ च्या उपसचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांच्या पत्राद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील वसतिगृह अधीक्षक, कामाठी इत्यादी पदावरील कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचे लाभ देण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील विजाभज आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या २००९ -१० पासून प्रलंबित असलेल्या भविष्य निर्वाह निधी हिशेब पावत्या तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२९-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
शासन शुद्धीपत्रक दिनांक २६/०९/२०२४ नुसार रजा रोखीकरणाबाबत निर्देश देण्यात आले असून त्याआधारे दिनांक ३०/०५/२०२५ च्या पत्रान्वये आश्रमशाळांतील वसतिगृह विभागातील कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(३) यवतमाळ जिल्ह्यातील विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सन २००९-१० पासून प्रलंबित असलेल्या भविष्य निर्वाह निधी हिशेब पावत्या नियमितपणे अदा करण्यात येत असून अंशत: राहीलेल्या पावत्या वाटपाची कार्यवाही सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, यवतमाळ

यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विविध कल्याणकारी शासकीय योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी सर्वेक्षण करणेबाबत

**(१२) ७३६८ (२५-०३-२०२६) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, विकास कामे, प्रकल्पांसह इतर ध्येय धोरणांचा सामान्य जनतेला मिळणाऱ्या लाभाचे मुल्यमापनाचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्वेक्षणात प्रामुख्याने कोणकोणत्या बाबी समाविष्ट आहेत तसेच याची जबाबदारी शासनाच्या कोण-कोणत्या विभागांवर सोपविण्यात आली आहे व सर्वेक्षणाला प्रत्यक्षात सुरुवात होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०२६) :** (१) होय,
(२) दिनांक १२/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय योजनांची, उपक्रमांची कार्यक्षमता, उपयुक्तता आणि प्रभाव यावर नागरिकांचे अभिप्राय मिळवण्यासाठी ऑनलाइन सर्वेक्षण करण्यात येईल. Google Forms, Survey किंवा सोशल मिडिया चॅनेल्सचा वापर करुन सर्वेक्षण करण्यात येईल. मुलाखती, दूरध्वनी सर्वेक्षण, लक्ष्यगट, सोशल मीडिया, वेबसाईटव्दारे अभिप्राय, गोपनीय अभिप्राय प्लॅटफॉर्म्स, डेटा विश्लेषण, इत्यादी बाबींचा सर्वेक्षणात समावेश असेल.

तसेच, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाव्दारे वरीलप्रमाणे सर्वेक्षणाव्दारे माहिती (डाटा) मिळवण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा (ई-निविदा इ.) अवलंब करुन CBC (DAVP) यादीवरील संस्थेची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार निवड झालेल्या मे.ॲक्सीस माय इंडिया या संस्थेस सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी दिनांक २०/०१/२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सदर संस्थेकडून सर्वेक्षणाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील शिवनी विमानतळाच्या विस्तारीकरणास विलंब होत असल्याबाबत

**(१३) ७५०२ (१७-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शिवनी विमानतळाच्या विस्तारीकरणाच्याबाबत गेल्या दोन दशकांपासून अनेकदा घोषणा होऊनही विस्तारीकरणाचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून तांत्रिक अडथळे, विविध कंपन्यांकडून उड्डाणांचे आश्वासन, जागेची उपलब्धता, निधींची मंजुरी अशा विविध कारणांनी विमानतळाच्या कामाला सद्य:स्थितीमध्ये अडथळे येत असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम पूर्ण झाल्यास कापूस, सोयाबीन, धान्य, मसाले आणि फळाबागा क्षेत्रासाठी ओळखला जाणारा प्रगत जिल्हा असल्याने व्यापार व उद्योग, वैद्यकीय सुविधा, शिक्षण, रोजगार आदि क्षेत्रासाठी याचा मोठा फायदा होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने विस्तारीकरणासाठी निधीची पुर्तता करण्यात आली आहे काय व किती निधी प्रस्तावित करण्यात आला आहे तसेच याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाला निवेदने, बैठका, अधिवेशन याच्या माध्यमातून पाठपूरावा केला असून तसेच विमानतळाचा ज्वलंत प्रश्न वर्षानुवर्षे रखडलेला असल्याने प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०२६) :** (१) (२) व (३) अकोला शिवनी विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी २२.२४ हेक्टर आर जमीनीची आवश्यकता आहे. सदर जमीन संपादित करण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २०८.७६ कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जमीन संपादन करण्याची प्राथमिक स्तरावरील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(१४) ७९५२ (१७-०३-२०२६) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठीच्या पात्रता गुणांमध्ये (कटऑफ) घट करण्यात आल्यामुळे पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या अनेक जागा रिक्त राहिल्या असल्याने सरकारी रुग्णालयामध्ये निवासी डॉक्टरांची कमतरता, रुग्णांच्या देखभालीचा प्रश्न, शिक्षकांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने भारतात विशेषत: डॉक्टरांची संख्या कमी असून जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनाप्रमाणे राज्यातील शासकीय आणि खाजगी दवाखान्यात आवश्यक वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१९-०५-२०२६) :** (१) राष्ट्रीय परीक्षा बोर्ड या केंद्रिय परिषदेकडून वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर पात्रता परीक्षा घेण्यात येते. तसेच किमान पात्रता निकष निश्चित करण्यात येतात.त्यामुळे सदर प्रवेशासाठी पात्रता निकष ठरविणे ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाही.

राष्ट्रीय परीक्षा बोर्डाच्या निकषांनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राज्यातील वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया पार पडली आहे.त्यानुसार सदर अभ्यासक्रमाच्या एकूण २८७१ जागांपैकी २६७९ जागा भरलेल्या आहेत.अशाप्रकारे संबंधित शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात पुरेसे निवासी डॉक्टर उपलब्ध होत आहेत.

(२) केंद्र शासनाच्या प्रेस इनफॉरमेशन ब्युरो (P.I.B) यांनी दिनांक १०/०२/२०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या माहितीनुसार भारतातील डॉक्टरांचे लोकसंख्येशी प्रमाण १:८११ असे असून ते जागतिक आरोग्य संघटनेच्या १:१००० या मानांकनाच्या प्रमाणात पुरेसे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव शहरातील टॉवर चौक परिसरात किरकोळ वादातून बेल्ट विक्रेत्यांवर जीवघेणा हल्ला झाल्याबाबत

**(१५) ७९८१ (१७-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव (जि.जळगाव) शहरातील टॉवर चौक परिसरात किरकोळ कारणावरून कमर पट्टे (बेल्ट) विक्रेत्यांवर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना दिनांक २८ डिसेंबर,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित तरुण गंभीर जखमी असून त्यांना उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले असून प्रकृती चिंताजनक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक ठिकाणी शस्त्रांचा वापर करून दहशत माजविणाऱ्या आरोपींविरुध्द कठोर कारवाई करून अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०५-२०२६) : (१)** सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांचे जळगाव शहरातील टॉवर चौकात बेल्ट व रेडीमेट कापडाचे दुकान आहे. दिनांक २६/१२/२०२६ रोजी फिर्यादी यांच्या दुकानाशेजारील इसमाने(आरोपीने) फिर्यादीच्या दुकानासमोर लोखंडी टेबल लावल्याच्या कारणावरुन दोघांमध्ये किरकोळ वाद झाला. सदरच्या वादातुन आरोपीने शिवीगाळ, दमदाटी करुन स्क्रु ड्रायव्हरने फिर्यादीस मारुन दुखापत केल्याप्रकरणी फिर्यादी यांच्या जबाबावरुन जळगांव शहर पो.स्टे. येथे CCTNS No. ४१८/२०२५ BNS कलम ११८(१), ३५१(२), ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**(२)** सदर घटनेतील जखमी यांची प्रकृती चिंताजनक नाही. वैद्यकीय अधिकारी यांनी आपल्या वैद्यकिय अहवालात Type of injury- Simple (साधी दुखापत) असल्याचे नमुद केले आहे.

**(३)** सार्वजनिक ठिकाणी शस्त्रांचा वापर करुन दहशत माजविणाऱ्या आरोपींविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

जळगांव शहर पोलीस ठाण्यांतर्गत:- प्रकार सन २०२४ सन २०२५ सन २०२६
(फेब्रु अखेर)

३/२५ (अग्निशस्त्र) ३ २ १
४/२५ (घातकशस्त्र) ८ ८ १
जळगाव जिल्हा पोलीस घटकांत:-प्रकार सन २०२४ सन २०२५ सन २०२६
(फेब्रु अखेर)
३/२५ (अग्निशस्त्र) ६८ ५८ ६
४/२५ (घातकशस्त्र) ८५ ७२ ६
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत पोषण आहार वाटप यंत्रणेतील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(१६) ८१११ (१७-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत पोषण आहाराचे वितरण करताना वापरण्यात येणाऱ्या चेहरा प्रमाणीकरण प्रणालीमध्ये नेटवर्क समस्या, ॲपमध्ये अडथळे, मोबाईल कॅमेऱ्याच्या अचूकतेचा अभाव तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील इंटरनेट उपलब्धतेच्या मर्यादा या तांत्रिक त्रुटीमुळे पोषण आहार वितरणाची नोंद पूर्ण होत नसल्याने अंगणवाडी सेविकांचे गुण (स्कोअर) कमी गृहीत धरून त्यांना मिळणाऱ्या भत्ता रकमेत कपात करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून पोषण आहार वितरणाशी संबंधित चेहरा प्रमाणीकरण प्रणाली लागू करताना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण, पर्यायी ऑफलाईन नोंद पध्दत, तक्रार निवारण व्यवस्था व तात्काळ दुरुस्ती यंत्रणा प्रभावीपणे उपलब्ध करून व अंगणवाडी सेविकांच्या कार्यक्षमतेचे योग्य मूल्यमापन करून योग्य प्रोत्साहन भत्ता मिळावा तसेच भविष्यात तांत्रिक कारणांमुळे कोणत्याही अंगणवाडी सेविकेचा गुण किंवा प्रोत्साहन भत्ता कमी होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२५-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

राज्यात अंगणवाडी लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) देतांना केंद्र शासनाच्या सूचनेनुसार चेहरा प्रमाणीकरण (FRS) प्रणालीचा वापर केला जात आहे. या प्रक्रियेत लाभार्थ्यांना सुरुवातीला ऑनबोर्ड करण्यासाठी आणि त्यांची ई-केवायसी (e-KYC) पूर्ण करुन फोटो काढण्यासाठी केवळ एकदाच इंटरनेटची आवश्यकता भासते. एकदा ही प्रक्रिया पूर्ण झाली की, त्यानंतर दरमहा दिला जाणारा आहार विना इंटरनेट (ऑफलाइन) सुविधेद्वारे वितरित करणे शक्य आहे. तसेच, अंगणवाडी सेविकांना याबाबत वेळोवेळी प्रशिक्षण देखील देण्यात आलेले आहे. त्यानुसार FRS द्वारे THR च्या वितरणाच्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सोलापूर जिल्हयात बसमधून अल्पवयीन मुलाला कंडक्टरने हायवेवर उतरविल्याबाबत

**(१७) ८१३६ (०४-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका अल्पवयीन मुलाला कंडक्टरने पास घरी राहिला म्हणून बसमधून हायवेवर उतरविल्याने संबंधित अल्पवयीन मुलाला रस्त्यावर एकटे सोडल्यामुळे त्याच्या जीवितास धोका निर्माण होऊन भीती व मानसिक तणावाखाली आल्याची घटना माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पवयीन प्रवाशांबाबत विशेष काळजी घेणे अपेक्षित असताना संबंधित कंडक्टरकडून मानवीयतेचा अभाव दाखवून नियमबाह्य व निष्काळजीपणे वागणूक देण्यात आल्यामुळे एसटी महामंडळाच्या प्रवासी सुरक्षितता धोरणांचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी एसटी कर्मचाऱ्यांना संवेदनशीलता व प्रवासी सुरक्षिततेबाबत विशेष प्रशिक्षण व स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे लागू करून सदर घटनेप्रकरणी संबंधित कंडक्टर व जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-०३-२०२६) :** (१) व (२) दिनांक १०/०१/२०२६ रोजी विद्यार्थी प्रथमेश राहुल पाटील व त्याचे सोबत एक विद्यार्थी आणि दोन प्रवासी ब्रम्हपुरी येथुन १७.०० वा. मंगळवेढा प्रवासाकरीता बसमध्ये चढले. प्रथमेशचे विद्यार्थी सवलत पास घरी विसरल्याचे लक्षात आल्यानंतर व त्याच्याकडे तिकीटाचे पैसे नसल्याने, त्याने वाहकाला उतरविण्याची विनंती केली तेव्हा अन्य प्रवासी व वाहकाने त्याचे तिकीटाचे पैसे देण्याचे कबुल केले, परंतु परतीला देखील प्रवासाचे पैसे लागणार असल्याने, त्याने बस थांबविण्याची विनंती केली. प्रथमेश पाटील या विद्यार्थ्याने केलेल्या विनंतीनुसार त्याला रस्त्यावर एकटे न सोडता एस.टी.च्या अधिकृत थांब्यावर दामाजी कारखाना चौक येथे सोडले आहे.

(३) व (४) सदर वाहकास आरोप पत्र बजावण्यात आले आहे. तसेच चौकशी कामी निलंबीत करून, चौकशी चालु आहे. सदर प्रकरणाची भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये म्हणुन, रा.प. महामंडळाकडुन विभागातील सर्व आगार व्यवस्थापकांना आगारातील सर्व कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलता व प्रवासी सुरक्षिततेबाबत योग्य ती दक्षता घेणेच्या सुचना देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

---

## अकोला येथील धर्मादाय उप आयुक्त व सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून चुकीच्या पध्दतीने सार्वजनिक न्यासाच्या जमिनीच्या लिलाव केल्याबाबत

**(१८) ८२८० (१७-०३-२०२६) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील धर्मदाय उप आयुक्त व सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालयामध्ये विविध कलमांखाली

झालेल्या नोंदी अनुसूची-१ मध्ये विहित मुदतीत अद्ययावत न केल्यामुळे सार्वजनिक न्यासांच्या कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदेश होऊनही दप्तर दिरंगाई व प्रशासकीय विलंबामुळे विश्वस्तांना बँक व्यवहार, शासकीय योजनांचा लाभ व न्यासाच्या वैधानिक कामकाजात अडचणी येत असून डिजिटलाईज्ड प्रणाली उपलब्ध असतानाही नोंदी व बदल अर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत काय, तसेच अकोला कार्यालयाकडून महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१-ए चा आधार घेऊन सार्वजनिक न्यासांच्या शेतीच्या लिलावाबाबत आदेश देण्यात येत असल्याचे तसेच संबंधित अधिकाऱ्यांना न्यासाच्या शेतीच्या प्रत्यक्ष लिलाव प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचे कायदेशीर अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कलम ३६ अंतर्गत स्वतंत्र तरतूद असताना कलम ४१-ए अंतर्गत घेतलेले लिलाव निर्णय कायद्याच्या चौकटीत बसत नसूनही मागील दोन वर्षांत अशा किती प्रकरणांत निर्देश देण्यात आले असून प्राप्त तक्रारींवर तसेच विलंब व अनियमिततेस जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १७ अन्वये प्रत्येक सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात विहीत करण्यात येतील अशी पुस्तके, निर्देशसुचीच्या व इतर नोंदवह्या ठेवणेबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे पारीत झालेल्या आदेशांनुसार अनुसूची-१ च्या नोंदी घेण्याकरीता तरतूद असून याबाबत वेळोवेळी संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. या नोंदीअद्यावत न झाल्यामुळे सार्वजनिक न्यासांच्या कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे तक्रार प्राप्त नाही.

(२) होय, अंशतः खरे आहे.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथील एक एकूण नोंदणीकृत न्यासांची संख्या २५८३५ असून त्यापैकी एकूण २१५७८ न्यासांच्या नोंदी परि-१ ला घेण्यात आल्या आहेत. उर्वरित ४२५७ न्यासांच्या कला नोंदी अनुसूची १ ला घेण्याचे काम चालु आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम २२ अन्वये नोंदणीकृत न्यासांच्या एकूण ३६८५ बदल अर्जाच्या नोंदी या अनुसुची एक ला घेण्याचेसुध्दा काम चालू आहे. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेमार्फत ऑनलाईन नोंदींचे कामकाज करण्याकरीता एजंसीची नेमणूक करण्यात आली असून दिनांक २४/१२/२०२५ पासून त्यांनी आज रोजीपर्यंत ४३० इतक्या ऑनलाईन नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. अनुसची एक न पुरविल्यामुळे बँकेचे काम, शासकीय योजनेचा लाभ न मिळाल्याने अडचणींचा सामना करावा लागल्याची एकही तक्रार या कार्यालयास प्राप्त नाही.

न्यासाच्या शेतीचे उचित उत्पन्न मिळून न्यासा आर्थिक हित साधण्याकरीता तसेच न्यासाची जमीन पडीत राहू नये, त्या जमिनीवर अतिक्रमण होवू नये म्हणून विश्वस्तांमार्फत, गावकऱ्यांमार्फत तसेच प्रशासक यांच्या तर्फे कलम ४१-अ अंतर्गत निर्देश प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यानंतर, तो अर्ज न्यायिक बोर्डावर नोंदविला जातो. प्रकरणाची पूर्ण सुनावणी झाल्यानंतर न्यासाच्या शेतीचे ठराविक कालावधीकरीता जसे की रब्बी व खरीप हंगामाकरीता एक वर्षाकरीता किंवा काही

प्रकरणात जास्तीत जास्त दोन वर्षापर्यंत जमीन कसण्याकरीता जाहीर लिलावाव्दारे देण्याचे निर्देश साधारणपणे सन २०१३ सालापासून दरवर्षी अकोला कार्यालयामार्फ़त देण्यात येत आहेत. सदर निर्देश देतांना ज्या न्यासावर प्रशासक नेमण्यात आले आहेत त्या न्यासाच्या प्रशासकांना निर्देश देण्यात येतात. न्यासाच्या विश्वस्तांमध्ये वाद असतील तसेच जे अर्ज गावकऱ्यांमार्फत प्राप्त झाले आहेत अशा प्रकरणी सर्व विश्वस्तांचे म्हणणे प्राप्त करुन न्यायिक बोर्डावर सुनावणी घेवून कार्यालयाच्या निरीक्षकांच्या उपस्थितीत संपूर्ण प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले जातात. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अथवा धर्मादाय उप आयुक्त यांनी स्वतःहून (Suo Moto) कोणत्याही न्यासाच्या बाबत अशा प्रकारचे निर्देश दिलेले नाहीत.
अकोला कार्यालयातील धर्मादाय उप आयुक्त व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांना न्यायिक बोर्डावरील अर्जामध्ये पूर्ण सुनावणीअंती निर्देश देण्याचे अधिकार आहेत. मात्र सदर अधिकारी न्यासांच्या शेतीबाबत प्रत्यक्ष लिलाव करतात किंवा त्या प्रकियेत थेट हस्तक्षेप करतात. हे खरे नाही. न्यायिक बोर्डावरुन निर्देश दिल्यानंतर संपूर्ण प्रक्रिया विश्वस्तांमार्फत कार्यालयाच्या निरीक्षकांच्या निगराणीखाली पूर्ण केली जाते. न्यायिक बोर्डावरुन निर्देश प्राप्त झाल्यानंतर कार्यालयाचे निरीक्षक अटी व शर्ती नमूद करुन न्यासाच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, मालमत्तेवर, ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे जमीन कसण्यासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करतात. तसेच दोन दिवस अगोदर न्यास स्थित असलेल्या गावामध्ये दवंडी देतात. प्रत्यक्ष लिलावाच्या दिवशी बोली बोलणाऱ्यांची यादी नमूद करुन जाहीर बोली गावकऱ्यांसमक्ष लावली जाते व त्याचा पंचनामा या कार्यालयाचे निरीक्षक तयार करुन संपूर्ण प्रक्रिया पार पडल्यानंतर त्याचा अहवाल धर्मादाय उप आयुक्त अथवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे सादर करतात. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये धर्मादाय उप आयुक्त अथवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे प्रत्यक्ष लिलाव करीत नाहीत अथवा त्यांचा थेट हस्तक्षेप नाही.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, नागपूर येथे दाखल रिट पिटीशन क्र.५५२७/२०२४ प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अकोला यांनी उक्त अधिनियमांतर्गत कलम ४१-अ अन्वये पारित केलेले न्यासाची ठराविक शेतजमीन, लिलाव्दारे भाडेतत्वावर देण्याकरीताचे निर्देश आव्हानित करण्यात आले होते. तसेच त्या प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांना प्रतिवादी क्र.१ म्हणून पक्षकार करण्यात आले होते. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे दिनांक १६/०१/२०२५ रोजीच्या आदेशामधील परिच्छेद क्र.१० व ११ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.
The short question arises as to whether respondent no.१ is empowered to give direction under section ४१ A of the Act. To ascertain the same, it would be proper to reproduce section ४१ A of the act, which reads thus: ४१ A. power of commissioner to issue directions [for proper administration of the trust-:-१. Subject to the provisions of this Act, the charity commissioner may from time to time issue directions to any trustee of a public trust or any person connected to ensure that the trust is properly administered, and the income there of is properly accounted for or duly appropriated and applied to the objects and for the purpose of the trust: and the charity commissioner may also give directions to the trustees or such person that if he finds any property of the trust is in danger of being wasted, damaged, alienated or wrongfully sold, removed or disposed of:

[Provided that, if any application is made by the trustee of any trust for seeking directions under sub- section (१), the Charity Commissioner shall decide such application within three months from the date of its receipt and if it is not practicable so to do, the Charity Commissioner shall record the reasons for the same)
(२) It shall be the duty of every trustee or of such person to comply with the directions issued under sub- section (१)११. A bar perusal of the provision of section ४१ A reveals that it empowers respondent no.१ to issue direction to the trustee of the public trust to ensure that the trust is administered properly and the income of the same is properly accounted for. It further appears from observations regarding the trust's income as taken from the audit report that the trust had an annual income of Rs/०१/९३ lakhs Therefore, in our opinion the issuance of direction by respondent No.१ conducting the auction of the land, except the land covered by the trees standing on the land, was passed to protect the interest and the welfare of the trust, is just and proper as respondent No. १ has empowered to do the same. Hence, we have answered the question in the affirmative.
(३) हे खरे नाही.

अकोला येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त व धर्मादाय उप आयुक्त यांचेकडून उक्त अधिनियमाच्या कलम ४१-अ अंतर्गत न्यासाचे हित लक्षात घेवून तात्पुरते निर्देश पारित केले जातात. तसेच कलम ३६ अंतर्गत जमिनीची विक्री, अदलाबदल, दान, तसेच शेतजमिनीचा १० वर्षापेक्षा जास्त कालावधी करीता व बिनशेती जमिनीचा तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी करीता भाडेपट्टा करावयाचा असल्यास धर्मादाय आयुक्त किंवा सह आयुक्त यांच्या परवानगीने करावा लागतो. कलम ३६ मधील तरतुदी व अकोला कार्यालयामार्फत कलम ४१-अ अंतर्गत देण्यात असलेले निर्देश हे दोन्ही भिन्न आहेत. मा.उच्च न्यायालयाचे वरील नमूद न्याय निर्णयानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त व धर्मादाय उप आयुक्त अकोला यांनी ४१-अ अन्वये पारित केलेले निर्देश कायदयाच्या चौकटीत बसतात. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या शेत जमीन लिलावाव्दारे भाडेतत्वावर देण्याकरीता मागील दोन वर्षामध्ये एकूण १२ प्रकरणामध्ये आदेश पारित करण्यात आलेले आहेत. आदेश पारित करण्यात आलेल्या १२ प्रकरणांपैकी ०२ प्रकरणामध्ये [WRIT PETITION NO.५५२७ OF २०२४ (रमेश रामराव भगत विरुध्द सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ आणि इतर) आणि WRIT PETITION NO.२७६५ OF २०२५ (भुजंगराव बबनराव दुत्तोंडे विरुध्द धर्मादाय उप आयुक्त आणि इतर)] आदेशांस मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे आव्हान देण्यात आले होते. परंतु या दोन्ही प्रकरणामध्ये धर्मादाय उप आयुक्त/सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी केलेले आदेश न्यासाच्या हितार्थ असल्याने कायम करण्यात आले आहेत. तसेच सदरहू प्रकरणात कोणत्याही प्रकारची तक्रार धर्मादाय आयुक्त कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच त्याबाबत विलंब व कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली/केलेली नसल्याने जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने माहिती व जनसंपर्क विभागांतील पदांसाठी सन २०२३ मध्ये दिलेल्या जाहिरातीबाबत

**(१९) ८३४० (२४-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने माहिती व जनसंपर्क विभागांतर्गत उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी व माहिती अधिकारी या वर्ग-१ व वर्ग-२ पदांसाठी माहे जानेवारी, २०२३ मध्ये जाहिरात दिली असून या जाहिरातीमध्ये शुध्दीपत्रक काढून त्यानुसार सन २०२५ मध्ये त्या पदांकरीता चाचणी परीक्षा घेण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीक्षेची प्रक्रिया पूर्ण होऊन तसेच मूळ जाहिरात प्रसिध्द होऊन मोठा कालावधी लोटूनही संबंधित परीक्षेचा अंतिम निकाल अद्याप घोषित करण्यात आलेला नसून ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, निकाल जाहीर करण्यात झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत; तसेच निकाल जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही सुरू केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०२६) :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे दिनांक १०/०५/२०२५ रोजी उपसंचालक(माहिती) गट-अ (वरिष्ठ)(१२९/२०२२), वरिष्ठ सहायक संचालक(माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ वरिष्ठ उपसंपादक गट अ (कनिष्ठ)(१३०/२०२२) व सहायक संचालक(माहिती), अधिपरिक्षक पुस्तके व प्रकाशने/ माहिती अधिकारी(गट-ब)(१३१/२०२२) या संवर्गातील एकूण ३४ पदांच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या आहेत. (याबाबत आयोगाने दिलेल्या ०४/०४/२०२५ रोजीच्या जाहिरातीची प्रत संलग्न)

वरील पदांपैकी उपसंचालक(माहिती) या संवर्गातील पदांबाबत अंतिम निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १७/०४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. उर्वरित संवर्गाच्या पदांबाबत लेखी परिक्षेच्या पुढील निवडप्रक्रीयेची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरू आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

जाहिरातीत नमुद उर्वरित संवर्गातील पदांबाबत चाळणी प्रक्रिया पूर्ण झालेली असून मुलाखतीसाठी पात्रता यादी प्रसिध्द करण्याबाबतची पुढील निवडप्रक्रीयेची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये कायमस्वरूपी लोक अदालत स्थापन करण्याबाबत

**(२०) ८३५६ (२४-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रलंबित न्यायप्रकरणांची संख्या कमी करून नागरिकांना जलद व किफायतशीर न्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये कायमस्वरूपी लोक अदालत स्थापन

करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपक्रमांतर्गत संबंधित जिल्ह्यांमध्ये न्यायालयीन इमारती, आवश्यक पायाभूत सुविधा, न्यायिक अधिकारी, कर्मचारी व इतर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्ययोजना आखली आहे, तसेच हा उपक्रम पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी कालावधी निश्चित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच या कायमस्वरूपी लोक अदालतांच्या माध्यमातून राज्यातील किती प्रलंबित दिवाणी व इतर तडजोडीने निकाली निघू शकणारी प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने लोक अदालत स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ च्या कलम २२(ब) अन्वये महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२४/१६९/प्र.क्र.१४७/का-२२,दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक उपयोगिता सेवांशी निगडीत केवळ दाखलपूर्व प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी राज्यातील २९ जिल्हयांमध्ये स्थायी लोकअदालत स्थापन करणेकरीता मान्यता देण्यात आली आहे.
(२) महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभागाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेल्या २९ स्थायी लोक अदालतकरीता अध्यक्ष, सदस्य व इतर कर्मचारी वर्ग अशा एकूण १७४ तात्पुरत्या अस्थायी पदांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, प्राधिकरणामार्फत दिनांक २६/२/२०२६ रोजी अध्यक्ष व सदस्य ही पदे भरणेकरीता जाहीरात प्रसिध्द करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) वरील १ व २ प्रमाणे,

स्थायी लोक अदालातीच्या माध्यामातून सार्वजनिक उपयोगिता सेवांशी निगडीत असलेली प्रकरणे मोठ्या प्रमाणात निकाली काढण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.